# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत

## भा.पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे ग्रामीण विकास अध्ययन केंद्र, समाजकार्य व संशोधन संस्था अहमदनगर

# शोध निबंध

**विद्यार्थिनीचे नाव:-** कु. मोनाली पोपट ठकारे

**वर्ग:-** MSW भग-2

**मार्गदर्शक:-** प्रा. प्रदीप जारे

**थीम:-** 'कोरोना विषाणूच्या काळातील समाज कार्यकर्त्यांचा प्रतिसाद'

**उपथीम:-** "कोरोना विषाणूच्या काळातील आर्थिक अस्थिरता आणि उपजीविका"

**विषय:-** कोविड-१९ ची सद्यस्थिती लक्षात घेऊन बचत गटाच्या माध्यमातून महिला सबलीकरण. (संदर्भ; सटाणा नगरपालिका ता.बागलाण जि.नाशिक)

# प्रस्तावना




- **क्षेत्रकार्य संस्था:** सटाणा नगरपालिका ता. बागलाण जि. नाशिक
- **सटाणा शहराची लोकसंख्या** :- ३७७०१
- **शहरातील एकूण बचतगट** :- १०३
- प्रस्तुत शोध निबंध हा कोविड-१९ची सद्यस्थिती लक्षात घेऊन बचत गटाच्या माध्यमातून महिला सबलीकरण” या विषयावर तयार केला आहे.
- सटाणा नगर पालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान या विभागात क्षेत्रकार्य करीत असतांना प्रामुख्याने कोविड-१९ मुळे उद्भवणाऱ्या आर्थिक समस्या लक्षात घेऊन कार्य केले

# सटाणा शहरतील सद्यस्थितीचे मुल्यांकन

- कोरोना विषाणू मुळे निर्माण झालेले आर्थिक परिणाम - रोजगार, उद्योग-व्यवसाय बंद.
- शैक्षणिक परिणाम - शाळा बंद, ऑनलाईन शिक्षणावर लक्ष नाही.
- आरोग्य विषयक परिणाम - कोरोना विषाणू सोबतच समुदायात डेंग्यु-मलेरिया आजाराला नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे.
- कोरोना विषाणू संदर्भात नागरिकांच्या मनात निर्माण झालेले गैरसमज व पूर्वग्रह



# कार्यपद्धती

- व्यक्तीसहयोग कार्य
- गटकार्य
- बचतगट पंचसूत्री पद्धत

१) नियमित बचत

२) नियमित बैठक

३) नियमित कर्जवितरण

४) नियमित परतफेड

५) नियमित लेखा अद्यावत ठेवणे



# हस्तक्षेप/उपक्रम

- शहरातील वेगवेगळ्या समुदायात जाऊन बचतगटाची माहिती दिली. व बचतगट स्थापन करण्यात आले.






- बचतगटातील महिलांना कर्ज उपलब्ध करून देण्यात आले.

# उपक्रम

- कोरोनाच्या काळात महिलांना स्वंय रोजगार विषयी माहिती देणे. व बचत गटातील महिलांची मिटिंग घेणे.







- बचत गटातील महिलांना परिसर स्वच्छता व आरोग्य विषयक मार्गदर्शन.

# उपक्रम

- महिलांना मानसिक तणावाबाबत समुपदेशन



- विद्यार्थ्यांना शैक्षणिक व आरोग्य विषयक मार्गदर्शन





## निरीक्षण

- सटाणा नगरपालिका अंतर्गत बचत गटातील महिलांसह काम करतांना असे निदर्शनास आले कि कोरोना  विषाणूच्या प्रादुर्भावाने अनेक कुटुंबीयांवर आर्थिक परिणाम झाले. लोकांचे उत्पन्नाचे स्रोत नाहीसे झाले. व त्यामुळे महिलांना नियमित बचत भरतांना आर्थिक आडचणी येत आहेत. या  कारणांनी महिला नकारात्मक प्रतिसाद देत होत्या.
- कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाने शहरात ज्यास्त पुढारी व राजकीय नेतृत्व असलेल्या व्यक्तींचे निधन झाले आहे.
- तसेच बहुतांशी कुटुंबात घरातील कर्ता व्यक्ती मृत्यू पावल्याचे निदर्शनास आले. या काळात महिलांना रोजगार व कर्ज उपलब्ध झाल्याने महिलांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून आले.

# शिकण्यास मिळालेल्या बाबी

- सटाणा नगर पालिका अंतर्गत शहरात विद्यार्थी प्रशिक्षणार्थी म्हणून समाज कार्यकर्त्याची योग्य भूमिका पार पडण्यास मिळाली.
- बचत गटाची स्थापना करण्यासाठी महिलांचा गटात सहभाग कशाप्रकारे वाढवावा हे शिकण्यास मिळाले.
- बचतगट कशाप्रकारे स्थापन केले जाते.व त्याचा प्रस्ताव तयार करून नगर पालिकेत सादर करणे इ.कामे प्रत्यक्षात शिकून घेता आली.
- महिलांना आरोग्य व स्वच्छता याविषयी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करता आले.
- समाजकार्य शिक्षणातील थेरी पेपरचा प्रत्यक्षात सराव झाला.व स्वतः मध्ये असलेले कौशल्य विकसित झाले.त्याचप्रमाणे ज्ञानात भर झाली व सकारात्मक दृष्टीकोन विकसित झाला.

# क्षेत्रकार्य अंतर्गत आलेली आव्हाने

- कमी वेळेत महिलांचा विश्वास संपादन करण्यासाठी आडचणी येत होत्या.
- कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांचा योग्य प्रतिसाद मिळाला नाही .त्यामुळे माविम संस्थेतील बचत गट सहयोगिनी व समुदाय संघटक यांच्यासह कार्य केले.
- बचत गट तयार करण्यासाठी महिला योग्य प्रतिसाद देण्यास नकार देत होत्या तसेच कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या भीतीने महिलांची मिटिंग घेण्यास आडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी चार ते पाच महिलांना सामाजिक अंतर ठेऊन माहिती देण्यात आली.
- या दरम्यान एक गट स्थापन झाल्या नंतरही काही महिलांच्या मनात पूर्वग्रह असल्याने गट विस्कळीत करण्यात आले. व नंतर इतर महिलांना माहिती देऊन गट तयार करण्यात आला.

# निष्कर्ष

**Outcome -**

1) लसीकरणाबाबत गैरसमज असलेल्या महिला लस घेण्यासाठी प्रवृत्त झाल्यावर त्यांनी लसीकरण करून घेतले.
2) समुपदेशन सत्राच्या माध्यमातून महिलांना ताण तणावातून बाहेर आणले व सकारात्मक वातावरण निर्माण करून दिले. त्यातून महिलांच्या मानसिक आरोग्यात सुधारणा झाली.
3) नगरपालिकेचा  फिरता निधीतून कोरोनाच्या काळात बचत गटातील महिलांना आर्थिक हातभार लागले.
4) आरोग्य विषयक मार्गदर्शनातून महिलांच्या आरोग्य विषयक सवयीत बदल झाले.व तसेच महिलांच्या मनातील कोरोना लसीकरणाबाबत गैरसमज दूर झाले.
5) बचत गटातील महिला नियमित बचत भरू लागल्या व गटाच्या मिटिंग मध्ये सहभागी होऊ लागल्या.

**Output**

1) कोरोना विषाणूची सद्यस्थिती लक्षात घेऊन महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी ८ बचत गटांना नगर पालिकेचा फिरता निधीचा फायदा झाला.
2) बचत गटाच्या माध्यमातून कोरोनाच्या काळात ४२ महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आले.
3) महिलांना बचत गटाची माहिती दिली.व त्यातून स्वयंरोजगारासाठी ५ महिला बचत गटांची स्थापना केली.
4) महिलांना उपजीविकेसाठी व स्वंयरोजगारासाठी कर्ज मिळाले त्यातून महिलांनी गृहउद्योग सुरु केले व उत्पनाचे स्रोत वाढले.

# धन्यवाद